**Collaborative Activity P.A.H. Solapur University and V.G. Shivdare College Inter Collegiate activity**






**Hon,'able Pro Vice Chancellor Dr. Dama L.B.**

## 08/12/2024

## Intercollege Karate Competition in collaboration with Our College




सत्यमेव जयते

सोलापूर
तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
10 Dec 2024 - Page 6

# खुल्या गटात प्रथमेश सुपाते, प्रतिमा टोणपे अजिंक्य



## महाविद्यालयीन कराटे शिवदारे महाविद्यालयात

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि. ९ डिसेंबर- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत खुल्या पुरुष गटात श्री. संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढेच्या प्रथमेश सुपाते व महिला गटात संगमेश्वर महाविद्यालयाच्या प्रतिमा टोणपे यांनी अजिंक्यपद पटकाविले.

व्ही. जी. शिवदारे कॉलेजने ही स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे उद्घाटन दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. बी. व्ही. शेटे, प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे, प्राचार्य डॉ. जी. के.कापसे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे, कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र जनरल सेक्रेटरी संदीप गाडे, समन्वयक संगीता जाधव, आंतरराष्ट्रीय कराटेपटू भुवनेश्वरी जाधव, प्राचार्य डॉ. भंडारकवठेकर, झोनल स्पोर्ट्स कौन्सिल चेअरमन डॉ. अनमोल वळसंगे, प्रा. लक्ष्मीपुत्र गोटे, जिल्हा अॅमेचूर स्पोर्ट्स कराटे असोसिएशन प्रमुख भीमराव बाळगे आदी उपस्थित होते.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धा आयोजन समितीचे सदस्य प्रा. एन. के. देशपांडे, प्रा. बि.डी. वाघचौरे, प्रा. शरण वांगी, पात्रता समिती सदस्य डॉ. एस. एस. तोरवी, प्रा. डॉ. डी. एम. बिराजदार, विद्यापीठ निवड समितीचे चेअरमन प्रा. एम. बी.पाटील, प्रा.संतोष गवळी, डॉ. आनंद धवन आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. डी. डी. बनसोडे यांनी केले. डॉ. व्ही. एस. अडकी यांनी आभार मानले.

पंच म्हणून मिहीर जाधव, गौतम वाघमारे विश्वजीत हेंबाडे, गणेश जाधव, दत्तात्रय हेमाडे, शिवानी वाघमारे यांनी काम पाहिले .

**स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम व द्वितीय) : पुरुष** - ५० किलो : रितेश शिंदे (केबीपी, पंढरपूर), समर्थ जाधव (वालचंद) ५५ किलो : आशिष कोकाटे ( डॉ. गणपतराव देशमुख कॉलेज, सांगोला), शंतनू कुलकर्णी (वालचंद अभियांत्रिकी). ६० किलो :शिवराज बोळकुटे (एस.बी.पाटील,मंद्रूप), चंद्रकांत तवटे (डीएचबी सोनी). ६७ किलो : संतोष जाधव (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी), मचंक स्वामी (सांगोला महाविद्यालय). ७५ किलो : आदित्य कळसे (माऊली, वडाळा), प्रणित गडहिटे (डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला). ८४ किलो : गणेश जाधव (दलित मित्र कदम गुरुजी कॉलेज, मंगळवेढा). ८४ किलोवरील : प्रथमेश सुपाते (श्री संत दामाजी, मंगळवेढा), कुबेर बनसोडे (सांगोला कॉलेज).

**महिला** - ४५ किलो : रेशम खान (संगमेश्वर), पायल शेंडे (एसएमपी कॉलेज, नातेपुते), ५० किलो : नक्षत्रा पकाले (हिराचंद नेमचंद), प्रीती राठोड (एसबीपी कॉलेज, मंद्रूप). ५५ किलो : दिपाली मदने (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी), प्राची साळुंखे (डीएसजी कॉलेज, मोहोळ). ६१ किलो : सृष्टी पवार (केबीपी, पंढरपूर), स्वामिनी डोळसे (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी), ६८ किलो : तेजस्विनी वाघमोडे (समीर गांधी महाविद्यालय, माळशिरस), रजनी गायकवाड (सोलापूर विद्यापीठ). ६८ किलोवरील : प्रतिमा टोणपे (संगमेश्वर), निदा शेख (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज).

दिव्य मराठी
सोलापूर 09-12-2024

# आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत ७० मुला-मुलींनी घेतला सहभाग

क्रीडा प्रतिनिधी | सोलापूर

सोलापूर विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत पुरुष गटात 14 महाविद्यालय आणि महिला गटात 13 महाविद्यालयांतील 70 खेळाडूंनी सहभाग नोंदवला. व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स येथे या स्पर्धेचे आयोजन केले होते.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.

स्पर्धेचा अंतिम निकाल ( प्रथम व द्वितीय ) : पुरुष गट : 50 किलो : रितेश शिंदे (प्रथम केबीपी, पंढरपूर) समर्थ जाधव, (द्वितीय, वालचंद कॉलेज, सोलापूर), 55 किलो : आशिष कोकाटे (प्रथम, डॉक्टर गणपतराव देशमुख कॉलेज, सांगोला) शंतनू कुलकर्णी , (द्वितीय, डब्ल्यू आय टी कॉलेज सोलापूर),

## विविध वजनी गटात प्रावीण्य मिळवलेले खेळाडू

कराटे स्पर्धेत रितेश शिंदे, समर्थ जाधव, आशिष कोकाटे , शंतनू कुलकर्णी, शिवराज बोळकुटे , चंद्रकांत तवटे, संतोष जाधव, मचंक स्वामी, आदित्य कळसे, प्रणित गडहिटे , प्रथमेश सुपाते, कुबेर बनसोडे या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

60 किलो : शिवराज बोळकुटे (प्रथम, एस बी पाटील कॉलेज, मंद्रूप), चंद्रकांत तवटे (द्वितीय, डी एच बी सोनी कॉलेज), 67 किलो : संतोष जाधव , (प्रथम, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी) मचंक स्वामी (द्वितीय, सांगोला महाविद्यालय).

75 किलो : आदित्य कळसे, (प्रथम, माऊली महाविद्यालय, वडाळा), प्रणित गडहिटे (द्वितीय, डॉक्टर गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला), +84 किलो : प्रथमेश सुपाते (प्रथम, श्री संत दामाजी महा. मंगळवेढा), कुबेर बनसोडे, (द्वितीय, सांगोला कॉलेज).